● वर्ष : ०३ ● अंक : ०६३ ● पुणे ● शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा




# नवले ब्रिज
# पुण्याचा 'डेथ स्पॉट'

**प्रतिक गंगणे**

## ५ वर्षांत १०८ अपघात, ३१ जणांचा मृत्यू - का थांबत नाहीत नवले ब्रिजवरील अपघात?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील नवले ब्रिजवरील अपघातांची मालिका काही केल्या थांबण्याचे नाव घेत नाही. जवळपास प्रत्येक काही महिन्यांनी भीषण अपघात होतो आणि पुन्हा नव्याने या ठिकाणाची सुरक्षा, रस्ता रचना आणि उपाययोजना यांवर प्रश्नचिन्ह उभे राहते. नुकत्याच झालेल्या १३ नोव्हेंबरच्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा या ठिकाणाच्या धोकादायक स्वरूपाची जाणीव करून दिली. या अपघातात कंटेनरचे ब्रेक फेल झाल्यानंतर जवळपास वीस वाहनांना धडक बसली, एका वाहनाचा स्फोट झाला, आग लागली आणि आठ जणांचा जागीच मृत्यू झाला.

नवले ब्रिजवरील अपघातांचे स्वरूप हे आगळेवेगळे असल्याचे तज्ज्ञ सांगतात. २०२३ मध्ये करण्यात आलेल्या अभ्यासानुसार गेल्या पाच वर्षांत येथे तब्बल १०८ अपघात नोंदवले गेले असून ३१ जणांचा मृत्यू झाला आहे. २०२१ मध्ये तर एकट्याच वर्षात १७ जणांनी येथे जीव गमावला.

कात्रज बोगद्यापासून नऱ्हे भागाकडे उतरताना नवले ब्रिजवर जवळपास ४.३ टक्क्यांचा तीव्र उतार आहे. तज्ज्ञांच्या मते हा उतार सुरक्षिततेच्या दृष्टीने ३ टक्क्यांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

**बोगद्यातून येणारी वाहने आधीच वेगात असतात. उतारावर गाड्यांचा वेग अनियंत्रित वाढतो.**

अनेक जडवाहनचालक उतारावर गाडी न्यूट्रलमध्ये टाकतात, त्यामुळे ब्रेक गरम होऊन ब्रेक फेल होण्याचे प्रमाण मोठे.

हा उतार समाप्त होताच लगेचच सर्विस रोड, चौक आणि वर्दळीचे रस्ते सुरू होतात. अचानक वेग कमी करण्याची वेळ येताच मोठे अपघात होतात.

**वाहतुकीची खिचडी – हायवे + सिटी ट्रॅफिक**

**नवले ब्रिजची वाहतूक ही पूर्णपणे मिश्र स्वरूपाची आहे. हायवेवरील कंटेनर, ट्रक, बस शहरातील दुचाकी, कार, रिक्षा खाजगी ट्रॅव्हल्सच्या पिकअप-ड्रॉपसाठी थांबणाऱ्या गाड्या**

या सर्व वाहनांची एकाच ठिकाणी निर्मिती होणारी गर्दी ही अपघातांची दुसरी मोठी कारणे आहे. लेन-शिस्त पूर्णपणे मोडीत निघालेली दिसते. एखाद्या वाहनाने अचानक ब्रेक लावताच मागील वाहनाला चुकण्यास पुरेशी जागा मिळत नाही.

या ठिकाणी होणारे अपघात किरकोळ नसून प्राणघातक असतात. आग, साखळी धडक, पलटी, ब्रेक फेल, जखमींना तातडीची मदत न मिळणे – अशा सर्वच प्रकारची भीषणता येथे वारंवार दिसते.

उतार संपताच नऱ्हे भागातील सेल्फी पॉईंट येतो. सततच्या अपघातांमुळे हा परिसर ब्लॅक स्पॉट म्हणून ओळखला जातो. येथे अपघात होण्याची शक्यता सर्वाधिक असल्याचे वाहतूक विभागानेही मान्य केले आहे.

नवले ब्रिजवरील समस्या ही फक्त वाहतुकीची नाही, तर रस्त्याच्या चुकीच्या रचनेपासून ते प्रशासनाच्या ढिलाईपर्यंत अनेक घटकांचे एकत्रित परिणाम आहेत. उपाययोजनांपेक्षा अपघातांचे आकडेच वाढत आहेत. पुण्याच्या महत्त्वाच्या प्रवेशबिंदूला लागलेले "डेथ स्पॉट"चे कलंकित नाव पुसायचे असेल, तर त्वरित आणि ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

## फोलपणा

**दर भीषण अपघातानंतर**
**पाहणी**
**बैठका**
**आराखडे**
**यांचा नेहमीच गजर होतो. पण प्रत्यक्षात फारसे काही बदलत नाही. रम्लर्स बसवणे, ओव्हरस्पीडिंग दंड, चेतावणी बोर्ड या सगळ्या उपाययोजना केवळ औपचारिक ठरत आहेत. एप्रिल ते जून २०२५ या तीन महिन्यांत जवळपास ११,००० वाहनांवर ओव्हरस्पीडिंगचा दंड ठोठावला. मात्र वेग नियंत्रित झाला नाही आणि अपघात थांबले नाहीत. उतारात बदल करणे, वाहतूक वेगळी करणे किंवा सुरक्षित रचना उभारणे या मूलभूत उपायांवर मात्र ठोस पावले उचलली जात नाहीत.**

## काय बदल करणे गरजेचे?

- तज्ज्ञांच्या मतानुसार, नवले ब्रिजवरील अपघात रोखण्यासाठी खालील पावले अत्यावश्यक आहेत—
- उताराची पुनर्रचना किंवा ग्रेडियंट कमी करणे
- जड वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध करणे
- पिकअप-ड्रॉपवर निर्बंध
- स्मार्ट स्पीड मॉनिटरिंग
- सर्विस रोड व चौकाची नवीन आराखडा पद्धतीत पुनर्बांधणी
- तातडीच्या परिस्थितीसाठी विशेष रेस्क्यू पथक
- नवले ब्रिजवरील अपघात थांबवण्यासाठी काय करायला हवे?



## महत्त्वाचे मुद्दे

- उताराचा ग्रेडियंट तांत्रिक पद्धतीने बदलणे (लांब उतार वाढवून तीव्रता कमी करणे)
- अवजड वाहनांसाठी स्वतंत्र लेन (हायवे आणि सिटी ट्रॅफिक वेगळे करणे)
- पिकअप-ड्रॉपच्या वाहतुकीवर निर्बंध
- स्मार्ट स्पीड-गव्हर्नर सिस्टम
- चौक, सर्विस रोड, U-टर्नचे पुनर्रचना
- तातडीचे आपत्कालीन प्रतिसाद पथक (फायर व मेडिकल टीम नेहमी स्टँडबाय)

## अपघातांचा वाढता आकडा – भीषण वास्तव

२०२१: १७ मृत्यू
२०२२: २२ अपघात; एका ट्रकने ४८ वाहनांना धडक
२०२३: संशोधनात पाच वर्षांत एकूण १०८ अपघात
२०२५: १३ नोव्हेंबरला भीषण साखळी अपघात; ८ मृत्यू

## नागरिकांनी उपस्थित केलेले प्रश्न

?

१) इतका तीव्र उतार सुरुवातीलाच का ठेवला? कमी का करता आला नाही?
२) रस्ता डिझाईन करताना योग्य तपासणी झाली का?
३) इंजिनिअरिंग विभागाने हा उतार सुरक्षित आहे का, याचे मूल्यमापन केले का?
४) नागरिकांच्या जीवापेक्षा रस्ता लवकर उघडणे का महत्त्वाचे ठरले?
५) चुकीच्या रचनांची जबाबदारी कोण घेणार?

## नवले ब्रिजचे भूगोल आणि महत्त्व

- साताऱ्याहून पुण्याकडे येताना कात्रज बोगदा पार करून लगेचच नवले ब्रिज येतो.
- हा पुण्याच्या प्रवेशद्वारांपैकी एक महत्त्वाचा बिंदू.
- नऱ्हे, वडगाव बुद्रुक, जांभुळवाडी, शिंदेवाडी अशा दाट लोकवस्तीच्या भागांना जोडणारा मार्ग.
- हाच ब्रिज हायवेवरील ट्रक-कंटेनरपासून ते शहरातील रिक्षा, दुचाकी, टेम्पो ट्रॅव्हलरपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीचा केंद्रबिंदू आहे.

# भूपेंद्र मोरे यांचे तिरडी आंदोलन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरात वाढत चाललेल्या अपघातांच्या मालिकेमुळे संतापलेल्या सामाजिक कार्यकर्ते श्री भूपेंद्र मोरे यांनी प्रशासनाविरोधात अनोखे "तिरडी आंदोलन" करून शासनाचा निषेध नोंदवला. अंत्ययात्रा आणि अंत्यविधीचे प्रतीकात्मक आयोजन करून नागरिकांसह त्यांनी शासनाला जाग देण्याचा प्रयत्न केला.

अलीकडच्या अपघातात लहान मुलीसह कुटुंबाची झालेली होरपळ पाहून मोरे भावुक झाले. "या भागात मृत्यूंची मालिका सुरू आहे... प्रशासन काहीच करत नाही. असेच चालू राहिले तर लोकांना जगण्यापेक्षा आत्महत्या करावीशी वाटेल," अशी वेदनादायी भावना त्यांनी व्यक्त केली. नऱ्हे धायरी वडगाव आणि आसपासचे नागरिकही भीतीच्या सावटाखाली आहेत.

मोरे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान जवळपास दोन तास सातारा–मुंबई महामार्गावरील वाहतूक ठप्प करण्यात आली होती. मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना कराव्यात, रस्त्यांची पाहणी करून कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी करण्यात आली.

- **मृत्यूंच्या वाढत्या घटनांवर तीव्र संताप**

मोरे म्हणाले, "शासनाचे अधिकारी पाहणी करून जातात, आश्वासने देतात... पण बदल काहीच होत नाही. आमचे जीव गेले तरी प्रशासन जागे होत नाही. तुम्ही केलेल्या मदतीने ते जीव पुन्हा येणार नाही त्यामुळे भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी आपण उपाययोजना करणे गरजेचे आहे"

या आंदोलनात श्री राजाभाऊ जाधव,विठ्ठल सूर्यवंशी, सुरज दांगडे, , हरीश वैद्य, लतिफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर, महेश गाडगे, सुशील भागवत, आनंद थेऊरकर, सुदर्शन देशमाने, सोनाली नायर यांसह अनेक नागरिक उपस्थित होते.

नऱ्हे परिसरातील लोकांच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर पुढील काळात आणखी मोठे आंदोलन उभे राहील, असा इशारा मोरे यांनी यावेळी दिला.

# निर्विवाद भाजप

बिहारमध्ये पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार येणार हे जितकं अपेक्षित होतं, तितकंच ही आघाडी द्विशतक ठोकेल, हे अनपेक्षित होतं. प्रत्यक्षात दोन्ही गोष्टी बिहारच्या मतदारांनी अगदी सहजपणे घडवून आणल्या. नितीशकुमार यांचा बिहारवर प्रभाव किती? या तिसऱ्या प्रश्नाचं उत्तरही मतदारांनी होकारार्थीच दिलं आणि राष्ट्रीय जनता दल जोपर्यंत आपल्या यादव - मुस्लीम परिघातून बाहेर येत नाही, तोपर्यंत त्यांची कामगिरी सुधारण्याची कोणतीही आशा नाही, हेही स्पष्ट केलं. मतदानोत्तर सर्वेक्षणाचे अंदाज किती फोल असतात हे बिहारच्या मतदारांनीही पुन्हा एकदा दाखवून दिलं. बिहारच्या निवडणूक निकालात मग लक्षणीय असं काहीच नाही का? तर, आहे. खूप काही आहे. काल संध्याकाळी उशिरापर्यंत सगळे निकाल लागले नव्हते. आकडे वरखाली होत होते. त्यामुळे, अशा अर्धवट निकालावर पूर्ण विश्लेषण करणं योग्य नाही म्हणून काही निष्कर्ष इथे आजच मांडता येत नाहीत. मतदारांनी जो कल दाखवला आहे, त्यावरून काही निरीक्षणं मात्र निश्चितच नोंदवता येतील. भारतीय मतदाराची मानसिकता कशी बदलते आहे, त्याचंच ते प्रतीक आहे. बिहारमध्ये यावेळी उच्चांकी मतदान झालं. महिलांचा उत्साह 'न भूतो...' असा होता. जातीचा विचार हे बिहारच्या मतदाराचं अगदी व्यवच्छेदक लक्षण मानलं जातं. यावेळी मात्र थोडं त्यापलीकडे जाऊन बिहारने भौतिक मुद्द्यांवर मतदान केलेलं दिसतं. निवडणुका हा जर स्वप्न दाखवण्याचा खेळ असेल, तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीतल्या भारतीय जनता पक्षाने तो आपल्या नेहमीच्या कौशल्याने जिंकला, असं म्हणता येईल.

गेली वीस वर्षं नितीशकुमार बिहारचं नेतृत्व करत आहेत. या वीस वर्षांत त्यांनी भाजप आणि राष्ट्रीय जनता दल या दोन्ही पक्षांना सोयीनुसार बरोबर घेतलं. आपल्या गरजेनुसार वाकवलं. लोक जनशक्ती पार्टी या आघाडीतल्या तिसऱ्या पक्षाचे पंख भाजपला कापायला लावले. त्यांच्या आजारपणाच्या चर्चा करणाऱ्या सगळ्यांची तोंडं बंद केली. या चर्चेमुळे मिळालेल्या सहानुभूतीचा पुरेपूर उपयोग करून घेतला. भाजपच्या बरोबरीने जागा निवडून आणल्या. पुढचा मुख्यमंत्री ठरवताना आपला शब्दच अंतिम राहील, एवढी कामगिरी तर नक्कीच केली. लढलेल्या जागांपैकी ९०% जागा जिंकून भाजप पहिल्या क्रमांकावर असला, तरी त्याच न्यायाने ८०% जागा जिंकून नितीशकुमार यांचा जनता दल (संयुक्त) दुसऱ्या क्रमांकावर आहे. लोक जनशक्ति पार्टी (रामविलास) ७६ टक्के यश मिळवून तिसऱ्या क्रमांकावर आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला एकूण मतदारांपैकी ५० टक्के मतांचा वाटा मिळेल, असा प्राथमिक अंदाज आहे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला जेमतेम १२५ जागा मिळाल्या होत्या. भाजपच्या त्यात ७४ जागा होत्या. जनता दल (संयुक्त) ४३ जागा जिंकून आघाडीत दुसऱ्या क्रमांकावर होता. या निवडणुकीत भाजपने आपल्या जागांत दणदणीत वाढ केली; पण त्यापेक्षाही जास्त वाढ नितीशकुमारांनी करून दाखवली. भाजपने दिलेल्या मुख्यमंत्रीपदाच्या संधीचं त्यांनी याप्रकारे सोनं केलं. विरोधकांनी त्यांना 'पलटूराम' म्हणून कितीही हिणवण्याचा प्रयत्न केला, तरी बिहारच्या जनतेने त्यांच्या 'सुशासनबाबू' या प्रतिमेवर शिक्कामोर्तब केलं. बिहारच्या जनतेला लालूंचं 'जंगलराज' अजूनही आठवतं आहे, हाच त्याचा अर्थ. महिला मतदाराला आपला जनाधार करण्याचा निर्णय नितीशकुमार यांनी पाच वर्षांपूर्वीच घेतला होता. त्याची सुरुवात त्यांनी बिहारमध्ये दारूबंदी लागू करून केली. भारतीय जनता पक्षाच्या अन्य राज्यांनी राबवलेल्या योजनेच्या धर्तीवरील 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजना' राबवून त्यांनी सव्वाकोटी महिलांच्या बँक खात्यात निवडणुकीपूर्वीच प्रत्येकी दहा हजार



रुपये जमा केले. १२५ युनिट मोफत वीज देण्याची कल्पना भाजपची. पण, त्या योजनेला सौर ऊर्जेची जोड देऊन सौर पॅनल मोफत देऊन दीड कोटी कुटुंबांना त्यांनी आपलंसं केलं. जातनिहाय जनगणना करून इतर मागासवर्गीयांतल्या अधिक मागास जातींचा विशेष गट करून त्यांच्यापर्यंत योजनेचे लाभ थेट पोहोचवण्याचा सामाजिक कार्यक्रमही त्यांना चांगला लाभ देऊन गेला. बिहारच्या एकूण लोकसंख्येत या जातींचा वाटा ३६ टक्के आहे.

भारतीय जनता पक्षाचा जनाधार असलेल्या उच्च जाती आणि नितीशकुमार यांनी जनाधार मिळवलेल्या या इतर मागास जाती अधिक जितनराम मांझी अधिक चिराग पासवान यांच्या पक्षाचे जनाधार मिळून बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मतदारांची सामाजिक मोट व्यवस्थित बांधली गेली. या जातीय समीकरणांपलीकडे महिला आणि युवकांना 'रालोआ'ने विशेष लक्ष्य केलं. हे राजकीय शहाणपण 'महागठबंधन' ला दाखवता आलं नाही. एखाद् दुसऱ्या जागेपुरती आपली ताकद शिल्लक राहिल्याचं भान अजूनही काँग्रेसला येत नाही. जुनी खोंडं, त्यांचे दुराग्रह दूर करणं राहुल गांधींना जमत नाही. त्यांनी मोठी पदयात्रा काढली. पुरात पोहून दाखवलं, पण जोपर्यंत ते पक्ष संघटना चालवून दाखवत नाहीत, तोपर्यंत मतदारांनी त्यांना मतदान का करावं? काँग्रेसच्या संघटनेचा, मतदाराचा आत्मविश्वास दर निवडणुकीगणिक ढासळतोच आहे. तो सावरायचा असेल, तर सामाजिक गणित जुळवणाऱ्या जाणकार सल्लागारांची त्यांना आवश्यकता आहे. केवळ आधुनिक पेहराव आणि भाषा करून भारतातला नवयुवक त्यांच्या मागे जाणार नाही, हे त्यांनी ओळखायला हवं. एका बाजूला मातीचा गंध नसलेले 'एलिट सल्लागार' आणि दुसऱ्या बाजूला ठार डावे यांच्यात स्वतः राहुल गांधी यांचाच तोल ढळला आहे. तो सावरणार नाही, तोपर्यंत काँग्रेसच्या भवितव्याबाबत कोणतीही आशा ठेवता येणार नाही. या निवडणुकीत राष्ट्रीय जनता दल हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल, असं भाकीत काहींनी वर्तवलं होतं. जमिनीवरचं वास्तव न पाहता हवेत इमले बांधणाऱ्यांची अशी भाकितं सपशेल फसतातच. तेजस्वी यादव यांचं मुख्यमंत्रीपदच काय, विधानसभेत विरोधी पक्षनेता तरी असेल की नाही, अशी आकडेवारी आहे! यादव आणि मुस्लीम या आपल्या परंपरागत मतदाराबाहेर पडायला 'राजद' तयारच नाही. राजदच्या १४२ उमेदवारांपैकी यावेळीही ५२ उमेदवार यादव होते. आपल्या परंपरागत कल्पना, जनाधार, 'कुटुंबाचा पक्ष' ही प्रतिमा यातून बाहेर पडल्याशिवाय त्यांना यश मिळणं शक्य नाही. पूर्वी यादव ज्या इतर मागासवर्गीय जातींचं नेतृत्व करत होता, त्या जातींनीच आपली जागा बदलली आहे, याचं भान यादव कुटुंबाला नाही. काँग्रेसला तर अशा गोष्टींची कुणकुणही नाही. अशा परिस्थितीत यापेक्षा वेगळ्या निकालाची अपेक्षा नव्हतीच.

# इंदुरीकरांनी कॉमेडी शो सुरू करावा : तृप्ती देसाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख उर्फ इंदोरीकर महाराज हे सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहेत. इंदोरीकर महाराज यांच्या मुलीचा शाही थाटात पार पडलेल्या साखरपुड्यानंतर इंदोरीकर महाराज यांच्यावर टीका होत आहे. त्यांच्या मुलीच्या कपड्यावर समाज माध्यमातून प्रचंड टीका करण्यात येत आहे. या सगळ्यातून उद्विग्न होत इंदोरीकर महाराज यांनी थेट आता कीर्तन सोडण्याचाच निर्णय घेतला आहे. मी एक अनौपचारिक व्हिडिओ करून कीर्तन सोडण्याचा निर्णय जाहीर करेल असे इंदोरीकर महाराज म्हणाले आहेत.





आमची पोरं लहान असताना आठ-आठ दिवस माझी त्यांच्याशी भेट होत नसे. मी लोकांसाठी धावत राहिलो. पण आता लोक इतके खाली गेलेत की माझ्या मुलीच्या अंगावरच्या कपड्यांवर कमेंट्स करत आहेत. यापेक्षा वाईट काय असेल? चार दिवसांपासून माझ्या मुलीच्या साखरपुड्याचे कपडे चर्चेत आहेत. पण तिच्या बापाला काहीही विचारत नाहीत. तुमच्याही मुली असतील. तिच्या कपड्यांवर कोणी बोललं तर तुम्हाला काय वाटेल? साखरपुड्यात कपडे मुलीकडून घेतले की नवरदेवाकडून? मग त्यावर माझा काय दोष? एवढी तरी लाज असावी ना. 31 वर्ष मी कीर्तन केलं, लोकांना प्रेरणा दिली, उपदेश केला पण आता मजा उरली नाही, असे इंदोरीकर महाराज म्हणाले.

लोकांच्या शिव्या खात खात आयुष्य गेलं पण आता हे व्यक्तिगत पातळीवर गेलं आहे. मी आजही समर्थ आहे उत्तर द्यायला पण कुटुंबावर बोट गेलं की सहन होत नाही. त्यामुळे मी एक अनौपचारिक व्हिडिओ सादर करून कीर्तन सोडण्याचा निर्णय जाहीर करेल असे देखील इंदोरीकर महाराज म्हणाले आहेत.

इंदोरीकर महाराज यांच्या कीर्तन सोडण्याच्या या निर्णयानंतर सामाजिक कार्यकर्त्या आणि भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्ष तृप्ती देसाई यांनी इंदुरकर यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. इंदोरीकर महाराज तुम्हाला कीर्तन सोडायचं की नाही हा सर्वस्वी तुमचा निर्णय आहे पण कीर्तन सोडून तुम्ही कॉमेडी शो सुरू करा, अशी घणाघाती टीका तृप्ती देसाई यांनी इंदोरीकर महाराजांवर केली आहे.

इंदोरीकर जेव्हा तुमच्या कीर्तनामध्ये दुसऱ्यांच्या मुलीची, आई-वडिलांची, घरच्यांशी बदनामी होत होती तेव्हा तुम्हाला काहीच वाटलं नाही. जेव्हा तुम्ही मुलीचा साखरपुडा शाही थाटात साजरा केला आम्हाला त्याबद्दल काहीच अडचण नाही. परंतु, तुम्ही जेव्हा सांगता की साधं लग्न केलं तरी मुलं होतातच किंवा कोणी वरात काढली कोण्या मुलीच्या ड्रेसवर बोलता अनेक बदनामकारक गोष्टी बोलला तेव्हा तुमच्यावर बोललं गेलं आहे, असं देसाई म्हणाल्या आहेत.

दरम्यान, आता तुम्हाला वाटत असेल की हे लोक तुमच्या घरापर्यंत बोलले, पण तुमच्या घरापर्यंत बोलण्याचा संबंध नव्हता.

परंतु, तुम्ही दुसऱ्यांच्या घरावरती बोलला तेव्हा तुमच्यापर्यंत हे लोक बोलले आहेत. मग आता तुम्हाला वाटत असेल की फेटा ठेवावा आणि हे बंद करावे तर तो तुमचा निर्णय आहे. कारण तुम्ही जेव्हा दुसऱ्यांना बोलता तेव्हा तुम्हाला मजा वाटते, तुम्ही हसता, तुम्ही टाळ्या वाजवायला लावता आणि तुमच्या घरापर्यंत आलं तर तुम्हाला वाईट वाटतंय. तुम्हाला कीर्तन करायचं नाही करायचं हा तुमचा प्रश्न आहे. शेवटी तुमचं कीर्तन नसतंच ती कॉमेडीच असते त्यामुळे तुम्ही कीर्तन बंद करा आणि कॉमेडी शो सुरु करा, असं म्हणत तृप्ती देसाई यांनी इंदोरीकर यांना थेट आता कॉमेडी शो सुरू करण्याचा सल्ला दिला आहे.

## तृप्ती देसाई यांना फोनवरून धमकी

**तृप्ती देसाई यांनी इंदुरीकर महाराजांच्या विधानावर आक्षेप घेतला होता. यानंतर इंदुरीकर महाराजांचे समर्थक अजित दुबे यांनी देसाईंना फोन करून धमकावले. या धमकीनंतरही तृप्ती देसाई यांनी माघार न घेता, "मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे आणि या विषयावर कोणत्याही व्यासपीठावर जाहीर चर्चेला तयार आहे," असे आव्हान दिले आहे. या प्रकरणावरून राजकारण आणि समाजकारणात चांगलीच चर्चा रंगली आहे.**

# ब्यूटी फेस्टिव्हलचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लग्नसोहळे, पार्टी आणि गिफ्टिंगचा सीझनच्या मुहूर्तावर 'नेक्सस वेस्टएंड मॉल' आणि 'द पॅव्हिलियन मॉल, पुणे' यांनी नुकत्याच बहुप्रतीक्षित ब्यूटी फेस्टिव्हलच्या तिसऱ्या पर्वाची 'द ग्लॉस बॉक्स'ची घोषणा केली. येत्या १४ नोव्हेंबरपासून सुरू होणारा हा उत्सव सौंदर्य, ग्रूमिंग आणि वेलनेस क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँड्सना एका छताखाली आणणार आहे. त्यामुळे पुणेकरांना ग्लॅमर, स्टाइल आणि सेल्फ-केअरचा आनंद घेता येणार आहे. या माध्यमातून खरेदीदारांना लग्न आणि सुट्ट्यांच्या हंगामासाठी मेकअप, स्किनकेअर, हेअरकेअरपासून सुगंधांपर्यंतच्या सर्व नव्या ट्रेंड्सची आणि अत्यावश्यक प्रॉडक्ट्सची ओळख होण्यास मदत होणार आहे. या फेस्टिव्हलमध्ये 'लाइव्ह डेमो', 'ब्यूटी एक्स्पर्ट्स'च्या




टिप्स आणि इंटरॲक्टिव्ह मेकओव्हर झोन्सचा समावेश असणार असून, याद्वारे आगामी सण आणि समारंभांसाठी सर्वोत्तम दिसण्यास मदत होणार आहे. 'नेक्सस वेस्टएंड मॉल'मध्ये शुक्रवार, १४ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी नायका आर्टिस्ट'कडून ग्लॉस बॉक्स मेकओव्हर सेशन तसेच फुर्ताडो स्कूल ऑफ म्युझिकच्या विद्यार्थ्यांचा आणि मेंटर्सचा लाइव्ह म्युझिकल परफॉर्मन्सचे आयोजन करण्यात येणार आहे. शनिवार, १५ नोव्हेंबर सकाळी १०:३०पासून बालदिन विशेष कार्यक्रम.

# नवले पुलावरील अपघात प्रकरणी मनसे आक्रमक

- **अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवले पुलावर गेल्या काही वर्षांत सुरू असलेल्या भीषण अपघातांच्या मालिकेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आतापर्यंत 200 हून अधिक बळी, तर कालच झालेल्या अपघातात आठ निरपराध नागरिकांचा मृत्यू आणि २५ हून अधिक जखमी अशी भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे सिंहगड रोड पोलीस स्टेशनमध्ये धडक देत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक संजय कदम यांच्यावर




सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची अधिकृत मागणी करण्यात आली. मनसेचे नेते शिवाजीराव मते पाटील यांनी पोलिसांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नवले पुलावरील रस्ता चुकीच्या पद्धतीने बांधला गेल्यामुळेच हे अपघात सुरू आहेत. या भीषण मृत्यूंची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी NHAI व प्रकल्प अधिकारी संजय कदम यांच्यावरच येते,त्यामुळे कायद्याप्रमाणे कारवाई करणे अत्यावश्यक आहे. मनसे पदाधिकाऱ्यांनी यासाठी पुणे पोलीस उपायुक्त (DCP) संभाजी कदम आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे यांची भेट घेऊन औपचारिक तक्रार नोंदवली.

मनसे शिष्टमंडळने पोलिस प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की "जर कायद्याला अनुसरून कारवाई झाली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून रस्ता रोको आंदोलन करू. कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी प्रशासनाची असेल."

नवले पुलावरील वाढत्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, या प्रकरणी तातडीने निर्णायक पावले उचलण्याची मागणी सर्व स्तरांतून होत आहे. शिवाजीराव मते पाटील पुणे शहराध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना विजय मते खडकवासला विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब मंडलिक सिद्धार्थ पोकळे हर्षल रायकर सोनाली ताई पोकळे हे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# 'कोडनेम लाइट' प्रकल्पाचे भव्य लोकार्पण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रतिष्ठित रिअल इस्टेट डेव्हलपर्स एसन लँडमार्क्स, सुयोग ग्रुप, आणि युनिटरी प्रॉपर्टी यांनी एकत्र येऊन आपल्या नवीन निवासी प्रकल्पाचा - 'कोडनेम लाइट' - शुभारंभ जाहीर केला आहे. या प्रकल्पाचे स्ट्रॅटेजिक पार्टनर म्हणून मॅएस्ट्रो रिअलटेक (एक प्रसिद्ध रिअल इस्टेट कन्सल्टन्सी आणि मार्केटिंग भागीदार) कार्यरत आहे. केशव नगर, पुणे येथे वसलेला हा प्रकल्प ४.५ एकरांवर विस्तारलेला आहे आणि यात २ आणि ३ बीएचके अशा आकर्षक घरांचा समावेश आहे, ज्यांचे क्षेत्रफळ ७७५ चौ. फुट ते ९९१ चौ. फुट पर्यंत आहे. नैसर्गिक प्रकाश, हवेशीरपणा आणि गोपनीयता यांचा उत्तम समतोल साधणाऱ्या या प्रकल्पाचे डिझाइन विचारपूर्वक तयार करण्यात आले आहे. विस्तीर्ण बाल्कनीज, सुबक रचना आणि उत्कृष्ट दर्जाचे फिनिशिंग यामुळे येथे राहणे अधिक सुखद अनुभव ठरणार आहे.




या प्रकल्पात १३ मजली तीन टॉवर्स असून, सुमारे १.१ एकरांवर हरित परिसर आणि ३० पेक्षा अधिक आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. यामध्ये स्विमिंग पूल, जिम, योगा व झुंबा स्टुडिओ, लायब्ररी, इनडोअर गेम्स झोन, स्पा आणि सॅलून, सोशल हब, मियावाकी फॉरेस्ट, आणि अँफीथिएटर यांचा समावेश आहे. याशिवाय, रेनवॉटर हार्वेस्टिंग, सोलर

सिस्टीम, एसटीपी आणि सीसीटीव्ही सर्व्हिलन्स यांसारख्या टिकाऊ आणि जबाबदार शहरी जीवनशैलीला प्रोत्साहन देणाऱ्या सुविधादेखील समाविष्ट आहेत.

प्रकल्पाच्या लोकार्पणाच्या वेळी श्री. नितीन गुप्ता, संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक, मॅएस्ट्रो रिअलटेक, म्हणाले, "कोडनेम लाइट हा आधुनिक रहिवासी प्रकल्पाचा एक उत्कृष्ट नमुना आहे - जिथे डिझाइन, आराम आणि शाश्वतता यांचा संगम घडतो. आम्हाला अभिमान आहे की आम्ही अशा प्रतिष्ठित भागीदारांसोबत काम करत आहोत जे नियोजनबद्ध आणि दीर्घकालीन मूल्य देणाऱ्या समुदायांच्या निर्मितीवर विश्वास ठेवतात." श्री. प्रणय ओसवाल, व्यवस्थापकीय संचालक, युनिटरी प्रॉपर्टी, यांनी सांगितले, "केशव नगर हे पुण्यातील सर्वाधिक विकसित होत असलेले निवासी क्षेत्र आहे. कोडनेम लाइटच्या माध्यमातून आम्ही आजच्या कुटुंबांच्या बदलत्या जीवनशैलीच्या गरजा पूर्ण करणारी, तसेच निसर्गाशी सुसंगत अशी घरे देण्याचा प्रयत्न करत आहोत." श्री. आदेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक, एसन लँडमार्क्स, म्हणाले, "आमचे ध्येय सदैव असे राहिले आहे की आमचे प्रकल्प रहिवाशांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडवतील. कोडनेम लाइट या दृष्टीकोनाचे प्रतीक आहे जिथे सुंदर वास्तुकला, खुली जागा आणि समुदायाभिमुख सुविधा एकत्र येतात." तसेच श्री. आशीष शाह, व्यवस्थापकीय संचालक, सुयोग ग्रुप, यांनी म्हटले, "या सहकार्यामुळे अनुभव आणि दृष्टिकोन यांचा एकत्रित लाभ मिळतो. आमचे उद्दिष्ट एकच आहे अशा घरांची निर्मिती करणे जी सोयीसुविधा, आराम आणि गुणवत्ता यांचे संतुलन साधतात. कोडनेम लाइट हे आधुनिकता आणि अर्थपूर्ण जीवन यांचा सुंदर संगम आहे."

# धायरीतील सीए परीक्षेतील उत्तीर्ण काजल शेंडकेचा सत्कार



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील कु. काजल दीपक शेंडके यांनी सनदी लेखापाल (सी.ए.) परीक्षा उत्तीर्ण करून धायरी व परिसराचा गौरव वाढवला आहे. या यशानिमित्त

माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी काजलचा सत्कार करत तिच्या कष्टाचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी परिसरातील नागरिक, कुटुंबीय आणि तरुणांनीही काजलचे उत्स्फूर्त अभिनंदन केले.

राजाभाऊ लायगुडे म्हणाले, "काजलचे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तिच्या जिद्दीने आणि मेहनतीने धायरीचा अभिमान वाढवला. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही निश्चित प्रेरणा मिळणार आहे" काजलच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्या भावी कामगिरीबद्दल सर्वांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### "निलंग्यात अभय दादांचा दमदार प्रभाव! हजारो युवकांचा काँग्रेस प्रवेश"

**निलंगा (आरंभ पर्व) : काँग्रेसच्या अभय दादा साळुंके यांच्या मजबूत नेतृत्वावर आणि माजी मंत्री अमित विलासराव देशमुख व आमदार धीरज देशमुख यांच्या विकासदृष्ट्या भूमिकेवर विश्वास ठेवत आज भाजपला एक मोठा धक्का बसला. शिरूर अनंतपाळ, देवणी आणि निलंगा तालुक्यातील भाजप युवा नेते बाळासाहेब सूर्यवंशी हालकीकर यांनी तब्बल दोनशे गाड्यांच्या ताफ्यासह हजारो युवकांना घेऊन निलंगा येथे काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय दादा साळुंके यांच्या हस्ते झालेल्या या भव्य प्रवेशामुळे लातूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या प्रवेशामुळे निलंगा विधानसभा, देवणी व शिरूर अनंतपाळ भागातील भाजपच्या संघटनाला मोठा फटका बसल्याचे राजकीय पटलावर स्पष्टपणे दिसून येत आहे. युवकांच्या प्रचंड उत्साहामुळे संपूर्ण निलंगा परिसरात काँग्रेस पक्षाच्या ताकदीत नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. काँग्रेस नेत्यांनी याला आगामी निवडणुकांचे 'सुरुवातीचे संकेत' असे संबोधत, विकासाच्या राजकारणावर लोकांनी पुन्हा विश्वास ठेवल्याचे सांगितले.**




### शाश्वत भविष्याच्या रचनेसाठी विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण

**पुणे (आरंभ पर्व) : डसॉल्ट सिस्टिम्स यांनी आज आकृती इनोव्हेशन स्पर्धा २०२५ मधील विजेत्यांची घोषणा केली. ही आंतरराष्ट्रीय उत्पादन डिझाइन स्पर्धा असून, भारतातील तसेच इतर देशांतील अभियांत्रिकी, डिझाइन आणि तंत्रज्ञान शाखेतील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेत जागतिक पातळीवरील गंभीर समस्यांसाठी नावीन्यपूर्ण उपाय विकसित करण्याचे आव्हान या विद्यार्थ्यांनी पेलले. यंदा स्पर्धेच्या विस्तार मोठ्या प्रमाणावर करण्यात आला असून, ३६ नव्या देशांचा सहभाग या उपक्रमात जोडला गेला आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यात मर्सिडीज-बेंझ इंडिया प्रायव्हेट लिमिटडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. कुलदीप वीज यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आकृती इनोव्हेशन स्पर्धा २०२५ ही स्पर्धा चार टप्प्यांत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ५०४ महाविद्यालयांतील १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी डसॉल्ट सिस्टिमच्या ३डी एक्सपिरियन्सच्या प्लॅटफॉर्मवर व्हर्च्युअली एकत्र आले होते. मानवी आरोग्य, शाश्वत शहरे, हरित ऊर्जा आणि शाश्वत गतिशीलता यांसारख्या क्षेत्रातील आवश्यक सकात्मक बदलांसाठी या सहभागी विद्यार्थ्यांनी टिकाऊ उपाय विकसित केले.**




### वर्टीव्ह ट्रेनिंग अकॅडमी आणि टेक्नॉलॉजी एक्सलन्स सेंटरचे उद्घाटन

**पुणे (आरंभ पर्व) : डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये जागतिक आघाडीचा ब्रँड वर्टीव्ह (Vertiv) यांनी पुण्यातील आपल्या इंटिग्रेटेड बिझनेस सर्व्हिसेस (IBS) सेंटर येथे नव्या वर्टीव्ह ट्रेनिंग अकॅडमी आणि टेक्नॉलॉजी एक्सलन्स सेंटरचे उद्घाटन केले. अत्याधुनिक तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि ऑपरेशनल एक्सलन्स यांना प्रोत्साहन देण्याच्या कंपनीच्या बांधिलकीला ही महत्त्वाची भर आहे. ही अकॅडमी डाटा सेंटर, कम्युनिकेशन नेटवर्क्स, कोलोकेशन, उद्योग आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांसाठी कार्यरत असलेल्या अभियंते, तांत्रिक तज्ज्ञ, व्यवसाय भागीदार आणि सेवा अभियंत्यांसाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण देणार आहे. आधुनिक डाटा सेंटरमध्ये वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक कूलिंग सिस्टीम्स, पॉवर स्विचगियर, UPS मॉड्यूल्स, थर्मल मॅनेजमेंट सोल्युशन्स इत्यादी उपकरणांवर लाइव्ह डेमो आणि हाताळणीचे प्रशिक्षण येथे दिले जाईल.**




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५





# नऱ्हे ते रावेत व्हाया सुतारवाडी या उन्नत मार्गाला गती देणार

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नवले पूल परिसराला भेट देत केली पाहणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवले पूल परिसरात गुरुवारी रात्री झालेला अपघात अत्यंत दुर्दैवी आहे. असा प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाईल. अल्पकालीन उपाययोजनांसंदर्भात उद्या (शनिवारी) संबंधित यंत्रणांसोबत बैठक घेतली जाईल. तसेच नऱ्हे ते रावेत व्हाया सुतारवाडी या उन्नत मार्गाचा विस्तृत प्रकल्प आराखडा (डीपीआर) मंजूर झाला असून त्याला गती देण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल,'अशी माहिती पुण्याचे खासदार केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शुक्रवारी दिली.



नवले पूल येथे गुरुवारी झालेल्या अपघातानंतर शुक्रवारी सकाळी मोहोळ यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या वेळी खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर, पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, पोलिस आयुक्त अमितेश कुमार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे संजय कदम आदी उपस्थित होते.

मोहोळ म्हणाले, '२०२२ मध्ये येथे मोठा अपघात झाला होता. त्यानंतर जांभूळवाडी ते वडगावपर्यंत सातत्याने होणारे अपघात थांबविण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. त्यातील रम्बलर्सची संख्या वाढवणे, स्पीड गन्स वाढवणे, पंक्चर्स बंद करणे यासारख्या काही अल्पकालीन उपाययोजना अमलातही आणल्या गेल्या आहेत. त्यामुळे गेल्या दोन तीन वर्षात अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. परंतु, गुरुवारच्या दुर्दैवी अपघातात आठ जणांना प्राण गमवावे लागले. त्यामुळे कायमस्वरूपीच्या उपाययोजनांना गती देणे आवश्यक आहे,'.

'मागील अपघातानंतर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत पुण्यात तसेच दिल्लीतही बैठक झाली होती. त्यात जांभूळवाडी ते सुतारवाडी व सुतारवाडी ते रावेत या ३२ किलोमीटर लांबीच्या व सुमारे सहा हजार कोटी रुपये खर्चाच्या उन्नत मार्ग (एलिव्हेटेड रोड) करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याचा 'डीपीआर'ही मंजूर झाला आहे. त्यामुळे येथील अपघात थांबविण्यासाठीच्या या दीर्घकालीन उपाययोजनेला गती देण्यासंदर्भात गडकरीजींची भेट घेऊन पाठपुरावा केला जाईल, असे मोहोळ यांनी नमूद केले.

'अल्पकालीन उपाययोजनांमध्ये या मार्गावरून येणाऱ्या ट्रक्सची खेड शिवापूर टोल नाक्याजवळच लोड व ब्रेक तपासणी करणे, स्पीड गन्स वाढवून कारवाई करणे, रम्बलर्स वाढवणे आणि सेवा रस्ते पूर्ण क्षमतेने विकसित करणे आदींचा समावेश आहे.

तसेच अवजड वाहनांना पर्यायी मार्गाने पुढे पाठवता येण्याविषयी चाचपणी केली जाईल. यासंदर्भात पुणे महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हा प्रशासन आणि पीएमआरडीए या सर्व घटकांची एकत्रित बैठक शनिवारी घेण्यात येईल. या सर्व यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव दिसल्यास कारवाई केली जाईल, असेही मोहोळ यांनी स्पष्ट केले.




# 'आफ्टर ओएलसी' चित्रपटात बॉस लेडी शिवानीचा नक्षल लूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'आफ्टर ओएलसी' चित्रपटाचं पोस्टर समोर आलं तेव्हापासून मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वे चर्चेत आली आहे. या चित्रपटातील आपल्या लाडक्या शिवानीचा एक वेगळाच नक्षल, डँशिंग, रावडी लूक पाहून साऱ्यांच्या नजरा वळल्या. अर्थातच शिवानी 'आफ्टर ओएलसी' या चित्रपटातून नेहमीपेक्षा एका वेगळ्याच भूमिकेतून दिसणार आहे. नक्षलवादी वेशात दिसणाऱ्या या लूकसाठी शिवानीने बरीच मेहनत घेतली आहे. इतकंच नाहीतर हा



सिनेमा संपूर्ण भारतात मराठी, कन्नड, आणि हिंदी भाषेतही प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे कानडी भाषेसाठीही शिवानीने विशेष मेहनत घेतली.

# निर्मला घुले प्रतिष्ठान आयोजित स्नेहमिलन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

कै. निर्मला घुले प्रतिष्ठानतर्फे आयोजित स्नेहमिलन हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या स्नेहमेळाव्याचा मुख्य आकर्षण म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या राष्ट्रीय विषयावरील 'पंच परिवर्तन' या विषयावर आयोजित केलेले विशेष व्याख्यान होय.

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. सुधीरजी काळकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. ते स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान, पुणे यांचे अध्यक्ष तसेच शि. प्र. मंडळी, पुणे यांचे विश्वस्त आहेत. त्यांनी पंच परिवर्तन या महत्त्वपूर्ण विषयावर मार्मिक मार्गदर्शन केले. उपस्थित



श्रोत्यांनी त्यांच्या विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास नांदेड नगर कार्यवाह श्री. महेशजी देसाई यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे स्नेहमिलनाचे वातावरण अधिक प्रेरणादायी झाले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन श्री. रुपेश घुले (मंडल अध्यक्ष, दक्षिण, खडकवासला विधान सभा संघ) आणि सौ. रश्मी रुपेश घुले यांनी अत्यंत उत्तम रीतीने केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी हेमेंद्र जोशी , तसेच रुपेशतात्या घुले मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले.

स्नेह, संवाद आणि राष्ट्रविचारांनी भरलेला हा स्नेहमिलन कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये भाजपा धायरी शिवने नांदेड़ मंडल चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदारजी सामंडकर तर आभार दत्ताभाऊ कोल्हे यांनी मानले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## किरकटवाडीमध्ये रोहिणी रहाणे यांची मंदिर भेट

खडकवासला (आरंभ पर्व) : भाजप पुणे शहर सचिव आणि प्रभाग 33 मधील इच्छुक उमेदवार रोहिणी रहाणे यांनी किरकटवाडी येथील काळभैरवनाथ मंदिरात जाऊन दर्शन घेतले. मंदिरात पूजा केल्यानंतर त्यांनी परिसरातील काही नागरिकांशी संवाद साधला.नागरिकांनीHi इतर काही अडचणी सांगितल्या. रहाणे यांनी या सर्व अडचणी लक्षात घेऊन त्यावर लवकर उपाय करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्यासोबत भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्तेही उपस्थित होते.



## गोसावी वस्तीत पाटबंधारे विभागाची कारवाई; वीस घरे जमीनदोस्त

पुणे (आरंभ पर्व) : वडगाव बुद्रुकमधील अभिरुची समोरील कॅनॉललगत असलेल्या गोसावी वस्तीत पाटबंधारे विभागाने आज सकाळी मोठी कारवाई करत वीस राहती घरे पाडली. दोन पोकलीन आणि एक जेसीबीच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. अचानक सुरू झालेल्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये मोठी धावपळ झाली. घरं पाडताना अनेक कुटुंबांचे घरातील सामान, भांडी, कपडे, कागदपत्रे तसेच मुलांची बॅग, वह्या आणि पुस्तके मलब्याखाली गेली. एका लहान मुलीने तिच्या शाळेच्या वह्यांसाठी केलेला टाहो पाहून अनेक लोकांच्या डोळ्यात पाणी आले. ही कारवाई पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, शाखा अभियंता रोहन ढमाले आणि कालवा निरीक्षक प्रसन्न परदेशी यांच्या पथकाने केली. सर्वसामान्य जनतेसाठी धावून जाणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले सामाजिक कार्यकर्ते श्री .भूपेंद्र मोरे यांनी घटनास्थळी जाऊन वस्तीतील परिस्थिती प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी रहिवाशांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. मोरे म्हणाले, "गोरगरीबांचे छत पाडून त्यांना रस्त्यावर आणणे चुकीचे आहे. प्रशासनाने आधी पुनर्वसनाची सोय केली पाहिजे होती." तसेच त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, या कुटुंबांचे तात्काळ पुनर्वसन न झाल्यास आंदोलन करण्यात येईल. तात्काळ या रहिवाशांना आधार द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे. घरे पडल्यानंतर अनेक कुटुंबे पूर्णपणे उघड्यावर आली असून त्यांचा एकच प्रश्न पडला आहे. याबाबत प्रशासन काहीतरी निर्णय घेईल या आशेवर हे सर्व नागरिक त्याच ठिकाणी वास्तव्यस राहिले आहेत.

# "स्मार्ट सुनबाई" २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रावर करणार राज्य!"

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नाविन्यपूर्ण संकल्पना आणि उत्सुकतेने सजलेला एक धमाल मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित हास्य, थरार आणि गूढतेने भरलेला एक नवाकोरा सिनेमा "स्मार्ट सुनबाई" २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या नुकताच रिलीझ झालेल्या ट्रेलर ने प्रेक्षकांच्या मनात औत्सुक्याची ठिणगी पेटवली आहे. एक स्पष्ट होतं की या कथेत काहीतरी विलक्षण आणि गूढ दडलेले आहे ज्यामुळे



चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. सिनेमात असलेल्या गाव-शहराची भन्नाट जुगलबंदी, खुमासदार विनोद आणि एका गूढ रहस्याचा ताण यांचा सुंदर मिलाफ यामुळे प्रेक्षकांच्या मनात एकच प्रश्न निर्माण झाला आहे. "ही स्मार्ट सुनबाई नक्की कोण? आणि तिच्या आयुष्यात असं काय घडणार आहे?"

संतोष जुवेकर, रोहन पाटील, भाऊ कदम, किशोरी शहाणे, सायली देवधर, मोहन जोशी, दीपक शिर्के, प्राजक्ता हनमघर, प्राजक्ता गायकवाड, उषा नाईक, अंशुमन विचारे, स्नेहल शिदम, विनम्र बाबल, भक्ती चव्हाण, दीप्ती सोनवणे, अनुष्का बेनके, पूजा राजपूत, सुचिका जोशी, विद्या मेहेत्रे, मोनिका बंगाळ, आर्या सकुंडे, वैशाली चौधरी, सपना पवार, कांचन चौधरी हे लोकप्रिय कलाकार या सिनेमात झळकणार असून, त्यांची केमिस्ट्रीच या चित्रपटाची खरी जमेची बाजू ठरणार आहे. चित्रपटाची कथा आणि लेखन योगेश शिरसाट यांनी केले असून, विजय नारायण गवंडे,साई - पियुष यांनी या सिनेमाला बहारदार संगीताची साथ दिली आहे. गीतकार वैभव देशमुख, अदिती द्रविड असून अजय गोगावले, वैशाली माढे, आनंदी जोशी, सावनी रवींद्र, उर्मिला धनगर यांचे सुरेल स्वर या सिनेमाला लाभले आहेत. प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची लाट निर्माण करणारा हा नवीन सिनेमा लवकरच मोठ्या पडद्यावर उलगडणार आहे.




# सर्व समावेशक विकासासाठी प्रयत्न करणार; दिपाली धीवार

## सौ. दिपाली संजय धीवार प्रभाग ३२ साठी संभाव्य उमेदवार म्हणून सर्वत्र चर्चेत




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीची तयारी वेगात सुरू असताना नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीनुसार प्रभाग क्रमांक 32 (वारजे–पॉप्युलर नगर) हा अनुसूचित जाती महिला गटासाठी आरक्षित ठरला आहे. या आरक्षणामुळे या प्रभागातील राजकीय अंदाजांना नवी दिशा मिळाली



असून सामाजिक कार्यकर्त्या दिपाली संजय धीवार या संभाव्य उमेदवार म्हणून नागरिकांमध्ये विशेष चर्चेत आल्या आहेत.

यांच्याशी मिशन महानगरपालिका या सदरामध्ये संवाद साधला . निवडणुकीच्या दृष्टीने विविध विषयावर आपले



मत व्यक्त केले.दिपाली धीवार या गेल्या अनेक वर्षांपासून प्रभागातील महिलांसाठी आणि गोरगरिबांसाठी विविध उपक्रम राबवत आहेत. महिलांसाठी साडीवाटप, महिलांच्या आरोग्याच्या गरजांवर लक्ष देण्यासाठी आरोग्य तपासणी शिबिरे, महिला सहली आणि मार्गदर्शन कार्यक्रम अशा उपक्रमांमुळे त्यांचे महिलांशी दृढ नाते निर्माण झाले आहे. त्याचबरोबर गोरगरिबांना अन्नधान्य, औषधे, शिक्षणासाठी मदत आणि इतर अत्यावश्यक गरजांसाठी दिपाली यांनी केलेल्या सहाय्याचे प्रभागातील अनेक कुटुंबांकडून कौतुक झाले आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी कार्य करण्याच्या त्यांच्या दृष्टीकोनामुळे त्या नागरिकांच्या मनात विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व म्हणून तयार झाल्या आहेत.

त्यांचे पती संजय धीवार हेही प्रभागातील ओळखीचे समाजसेवक असून आंबेडकरवादी विचारांनी प्रेरित कार्यकर्ता म्हणून त्यांची निश्चित प्रतिमा आहे. त्यांनी यापूर्वी खडकवासला विधानसभा निवडणूक लढवली असून समाजातील विविध स्तरांशी त्यांचा थेट संपर्क आहे. गोरगरिबांना मदत, नागरिकांच्या अडचणी सोडवणे, समाजातील विविध जयंती आणि उत्सव शिस्तबद्धपणे साजरे करणे या कार्यामुळे प्रभागात त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी आणि समतेच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कामावर जाणवतो, अशी प्रभागातील अनेक नागरिकांची प्रतिक्रिया आहे.

आरक्षण जाहीर झाल्यानंतर दिपाली संजय धीवार यांनी सांगितले की, "ही फक्त निवडणुकीची संधी नाही, तर माझ्या प्रभागातील महिलांनी आणि नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाची जबाबदारी आहे. प्रभागातील प्रत्येक नागरिकाचा विकास हा आमचा उद्देश आहे. महिलांच्या सुरक्षेला, युवकांच्या संधींना आणि मूलभूत सुविधांना मी प्राधान्य देणार आहे."

त्यांनी पुढे सांगितले की, वारजे–पॉप्युलर नगरमध्ये एकही समाज, घटक किंवा नागरिक विकासापासून वंचित राहणार नाही. सर्वसमावेशक विकास हाच माझा मार्ग आहे.

प्रभाग 32 मध्ये आरक्षण जाहीर झाल्यानंतर स्थानिक नागरिकांमध्ये चर्चांना अधिक वेग आला आहे. दिपाली धीवार यांच्या कार्यशैलीबद्दल, जबाबदारीबद्दल आणि लोकांशी असलेल्या संपर्काबद्दल नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. आता त्या कोणत्या पक्षातून निवडणूक लढवणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग 32 हा महत्त्वाचा प्रभाग ठरणार असून येत्या काही दिवसांत राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट होतील, अशी प्रभागातील नागरिकांची अपेक्षा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रभाग ३२चे आरक्षण जाहीर होताच दिपाली धीवार समर्थकांचा जल्लोष

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिका निवडणुकांची रंगत वाढत असताना आरक्षण सोडत जाहीर झाली असून प्रभाग क्रमांक 32 (वारजे – पॉप्युलर नगर) हा अनुसूचित जाती महिला या गटासाठी आरक्षित ठरला आहे. त्यामुळे या प्रभागातून मागासवर्गीय समाजातील महिला उमेदवाराला प्रतिनिधित्वाची संधी मिळणार आहे. या जाहीरातीनंतर सामाजिक कार्यकर्त्या दिपाली संजय धीवार या प्रभागातून इच्छुक म्हणून प्रमुख चर्चेत आल्या आहेत. आरक्षणाची माहिती समजताच वारजे ब्रिज परिसरात त्यांच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर, आणि घोषणांनी परिसर दुणावून गेला. कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे प्रभागातील राजकीय वातावरण निश्चितपणे बदलल्याची जाणीव होत होती. यावेळी बोलताना दिपाली धीवार म्हणाल्या, “प्रभागातील सर्वांगीण विकास, महिलांसाठी सुरक्षित सुविधा आणि स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देणार आहोत.” तर सामाजिक कार्यकर्ते संजय धीवार म्हणाले, “डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना दिशा मानून आम्ही जनतेसाठी काम करत आहोत. प्रभागाच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जनतेने पाठिंबा दिल्यास ही मनोकामना पूर्ण नक्की करू.” या जल्लोषात मोठ्या संख्येने भीमसैनिक आणि कार्यकर्त्यांचा सहभाग होता. आगामी निवडणुकीत दिपाली धीवार कोणत्या पक्षातून उमेदवारी करतात याकडे प्रभागातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### श्री. लक्ष्मण दशरथ सुंबे यांचे निधन



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : दै. आरंभ पर्वचे निष्ठावान पत्रकार सचिनजी सुंबे यांचे वडील श्री. लक्ष्मण दशरथ सुंबे (आण्णा) (वय ८८) यांचे आज, गुरुवार १३ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. काही दिवसांपासून किरकोळ प्रकृतीत त्रस्त असताना अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने सुंबे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. श्री. सुंबे (आण्णा) हे साधे, शांत स्वभावाचे, समाजाशी नाळ जोडून राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात परिचित होते. आपल्या परिवाराची कर्तव्यनिष्ठेने सेवा करत आयुष्यभर साधेपणाचा आदर्श जपणारे ते प्रेमळ आणि दयाळू स्वभावाचे होते. गावातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग उल्लेखनीय होता.



### सारोळे येथे बालदिन उत्साहात साजरा

बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यातील सारोळे येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बाल दिन म्हणून साजरी करण्यात आली. त्यावेळी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

दैनिक आरंभपर्व
साप्ताहिक संपादकांसाठी
खास ऑफर
१ महिन्याचे ४ अंक (४ पानी)
फक्त ₹८,०००/-
(पहिल्या ५ लोकांसाठी खास ऑफर !)
नंतरचे शुल्क (४ पाने – ४ अंक)
₹ १२,०००
प्रिंटींगची सोय उपलब्ध (अतिरिक्त शुल्क आकारले जाईल)
मर्यादित कालावधीसाठीच ही ऑफर लागू आहे.
आजच तुमच्या साप्ताहिकासाठी सुवर्णसंधीचा लाभ घ्या!
संपर्क: प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२ / ८६५७८६५७०२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
पुणे जिल्हा: इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर: धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# समाविष्ट गावांच्या विकासासाठी योगदान द्यायला हवं : अभिजीत धावडे

## प्रभाग क्रमांक ३३ साठी भाजपकडून इच्छुक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी – शिवणे – खडकवासला तसेच कोंडवे–धावडे परिसरात गेली वीस वर्षे सातत्याने काम करत नागरिकांचा विश्वास जिंकणारे अभिजित धावडे हे भारतीय जनता पार्टीतील निष्ठावान आणि सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. विद्यार्थी दशेत विद्यापीठ प्रतिनिधीची निवडणूक लढवून त्यांनी आपल्या नेतृत्वगुणांची छाप उमटवली होती. त्यानंतर युवकांच्या चळवळीत काम करताना त्यांनी युवकांसाठी प्रेरणादायी नेतृत्व प्रदान केले.

अभिजित धावडे यांची राजकीय वाटचाल अधिक भक्कम झाली ती वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनामुळे. सध्याचे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांच्याशी त्यांचे घट्ट स्नेहसंबंध आहेत. दोन्ही नेत्यांकडून मिळणारा पाठिंबा आणि मार्गदर्शनामुळे ते प्रभागात विश्वासार्ह नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत. नागरिकांशी थेट संवाद, तातडीच्या प्रश्नांवर घेतलेला पाठपुरावा आणि प्रशासनाशी प्रभावी समन्वय यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेतली जात आहे.

दैनिक आरंभ पर्वच्या मिशन महानगरपालिका सदरामध्ये त्यांनी प्रभाग विकासाची आपली भूमिका स्पष्ट केली. धायरी, शिवणे, खडकवासला आणि कोंडवे–धावडे भागात वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत भौतिक सुविधांची मोठी कमतरता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कोटी भागात सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. मुलं, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मैदानी गार्डन, क्रीडांगण, हरित उद्याने आणि ओपन स्पेस उपलब्ध नाहीत. वाढत्या शहरीकरणात या सुविधा हेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचे महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांच्या म्हणण्यानुसार - “प्रभागाचा संपूर्ण विकास म्हणजे फक्त रस्ते आणि वीजपुरवठा नव्हे. नागरिकांना मूलभूत सोयी, स्वच्छतागृहे, गार्डन, खेळाचे मैदान आणि सुरक्षित जागा मिळाल्या तरच त्यांचा जगण्याचा दर्जा उंचावतो. प्रभाग 33 ला या सुविधा तातडीने आवश्यक आहेत.”

अभिजित धावडे यांनी गेल्या अनेक वर्षांत नागरिकांच्या तक्रारी, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, सार्वजनिक सुविधांबाबत सतत पाठपुरावा केला आहे. अनेक तरुणांना राजकारणात सक्रिय होण्यासाठी प्रेरित केले आहे. त्यांच्या संघटन कौशल्यामुळे प्रभागात युवकांचा मोठा आधार त्यांच्यासोबत उभा असल्याचे चित्र दिसते.

प्रभाग क्रमांक 33 (धायरी – शिवणे – खडकवासला) मधून भारतीय जनता पार्टीतर्फे ते इच्छुक असून, त्यांची दावेदारी स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांमध्ये मजबूत मानली जात आहे. प्रभागातील समस्या ओळखून त्यावर उपाययोजना करण्याची त्यांची तयारी, तरुणांना सोबत घेऊन काम करण्याची वृत्ती आणि विकासाबाबतचा स्पष्ट दृष्टिकोन यामुळे त्यांना पुढे आणावे, अशी मागणीही प्रभागात होत आहे.

लोकाभिमुख काम, सातत्य, प्रामाणिकता आणि नागरिकांचा वाढता विश्वास यांच्या जोरावर अभिजित धावडे हे प्रभाग क्रमांक 33 साठी दमदार, तडफदार आणि विश्वासार्ह नेतृत्व म्हणून पुढे येत असल्याचे दिसत आहे.

# ईमामी लिमिटेडने धोरणात्मक रिब्रँडिंगची घोषणा केली

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

केश किंग, भारताचा अग्रगण्य आयुर्वेदिक हेअरकेअर ब्रँड आहे. ह्या ब्रँडने स्वतःचा एक रूपांतरात्मक रिब्रँडिंगचा पुढाकार घेऊन सादर केले आहे केश किंग गोल्ड. यामुळे ब्रँडची ओळख, प्रस्ताव आणि पॅकेजिंगला एक नवा आणि आकर्षक दर्जा मिळाला आहे. ह्या रिब्रँडिंगच्या पुढाकाराने ईमामीने आपल्या ब्रँड केश किंग ब्रँडसाठी एक वेगळी धोरण आत्मसात केली आहे. आता हे आपल्या पारंपारिक आयुर्वेदिक मूळांपर्यंत मर्यादित नाही, तर, हा एक दमदार नवा विचार आत्मसात केला आहे: आयुर्वेद + विज्ञान.




उत्पादनाच्या ह्या नव्या स्वरूपामुळे ग्राहकांना उत्तम गुणवत्ता, प्रभावकारकता आणि उपयोगाचा फायदा मिळेल आणि तेसुद्धा एका नव्या रूपात. ब्रॅण्डची आयुर्वेदिक परंपरा न बिघडवता, हे नवे उत्पादन ग्राहकांची मागणी लक्षात ठेवून तयार करण्यात आले आहे. आजकालच्या काळात ग्राहक खरेपणा, कामगिरी आणि वैज्ञानिकरीत्या प्रमाणित उत्पादने पसंत करतात. केश किंग गोल्ड ग्राहकांच्या सर्व मागण्या पूर्ण करते कारण ह्यात आहे ग्रो बायोटिन आणि प्लांट ओमेगा 3-6-9 सारखे प्रमुख वैज्ञानिक घटक व सोबत 21 विश्वसनीय आयुर्वेदिक वनौषधिंचे शक्तिशाली सक्रिय संघटक. केस उगवणे आणि केस गळणे कमी करण्यात ह्या उत्पादनांची उपयुक्तता क्लिनिकली प्रमाणित आहे. ह्या धोरणात्मक बदलाचा भाग म्हणून केश किंग केसांशी संबंधित असलेल्या वाढत्या समस्यांसाठी काही नवीन कॅटेगरीज मध्ये आपला प्रवेश करीत आहे. ह्या प्रवेशाद्वारे समस्यांसाठी उपयोगी समाधाने मिळतील. केस वाढ ही अजुनही एक महत्त्वाची अपूर्ण गरज आहे, हे ओळखून, ह्या ब्रँडने केश किंग गोल्ड रेंजच्या अंतर्गत आणले आहे एक नवे आधुनिक उत्पादन, ॲडव्हांस्ड हेअर ग्रोथ सिरम. ह्या सिरम पॅकमध्ये सर्वात जास्तं प्रमाणात आहे ग्रोथ ॲक्टिव्हस - आयुर्वेदिक वनौषधि आणि रेडेंसिल, ॲनागेन, कोपोक्सिल ॲक्वा आणि प्रोकॅपिल सारख्या शक्तिशाली मॉलिक्युल्सचे अद्वितीय मिश्रण- जे प्रत्यक्ष दाखवते केसांची वाढ. ह्या वेळेस आपला शब्द ठेवून सौ. प्रीति ए. सुरेका, एक्झेक्युटिव्ह डायरेक्टर, ईमामी लिमिटेड, म्हणाल्या, “केश किंगचे हे रिब्रँडिंग फक्त देखाव्यासाठी केलेला बदल नही, - तर ह्यात धोरणात्मकरीत्या उल्लेखनीय बदल करण्यात आले आहेत. हा ब्रँड केसांच्या संपूर्ण देखरेखीत केश किंगला गोल्ड स्टँडर्ड म्हणून स्थापित करु इच्छितो, जे त्यांच्या भविष्यातील योजनांचा एक भाग आहे. केश किंग गोल्डमध्ये आयुर्वेदाचे ज्ञान आणि आधुनिक संशोधनाच्या परिणामांना एकत्र करण्यात आले आहे. ही नवी ओळख विशेषरीत्या त्या पीढीसाठी तयार करण्यात आली आहे, जी विश्वस्नीय घटक, दृष्यमान कार्यप्रभाव आणि महत्त्वाकांशी प्रगत मूल्यांची उमेद ठेवतात आणि प्रत्यक्षात परिणाम बघू इच्छितात.”

# सरपंच शरद (लालाशेठ) जावळकर संघाचा विजयी जल्लोष!



**डोणजे (दै. आरंभ पर्व)**

कोंढाणा प्रीमियर लीग डोणजे पर्व–१ स्पर्धेमध्ये सरपंच शरद (लालाशेठ) जावळकर यांच्या संघाने दमदार खेळ करत प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामन्यात संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सर्वांना प्रभावित केले. संघ मालक शरद (लालाशेठ) जावळकर यांनी आपल्या सर्व खेळाडूंचे मनापासून कौतुक केले.संघाचे नेतृत्व कॅप्टन रमेश पवार यांनी नेटाने व कौशल्याने केले. संघामध्ये लक्ष्मण जाधव, गणेश माने, मयूर माताळे, संतोष जावळकर, अर्जुन कोकरे, अविनाश जावळकर, अनिकेत माताळे, शंकर पवार, सौरभ चव्हाण, निखिल जगताप, रितेश बीरघड, सुनील तिडके व राहूल जोरकर या खेळाडूंनी महत्वाची भूमिका बजावत संघाला विजेतेपद मिळवून दिले. विजेत्या संघाला ₹51,000 चे पारितोषिक व भव्य ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. या विजयामुळे संपूर्ण डोणजे परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

# आदिवासी उत्पादनांना प्रोत्साहन देणार केंद्र सरकार

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री पीयूष गोयल यांनी सांगितले की निर्यातीची क्षमता असलेल्या सर्व आदिवासी उत्पादनांना वाणिज्य विभागाकडून पूर्ण मदत दिली जाईल. ही मदत ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, आंतरराष्ट्रीय गोदामे (उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्रीसाठी), तसेच घाऊक आणि किरकोळ व्यापार नेटवर्कद्वारे दिली जाईल. श्री गोयल हे आज नवी दिल्ली येथे झालेल्या ट्रायबल बिझनेस कॉन्क्लेव्ह 2025 या कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी केंद्रीय आदिवासी कार्य मंत्री श्री जुएल ओराम देखील उपस्थित होते.वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीपीआयआयटी) आणि आदिवासी कार्य मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. भगवान बिरसा मुंडा यांच्या 150व्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या ‘आदिवासी गौरव वर्ष’ दरम्यान हा एक ऐतिहासिक क्षण ठरला. श्री गोयल यांनी माहिती दिली की आदिवासी उत्पादनांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत योग्य ओळख आणि स्थान मिळावे यासाठी निर्यात प्रोत्साहन वाढविण्याची एक नवी योजना तयार केली जात आहे.श्री गोयल यांनी सांगितले की देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही बाजारपेठांमध्ये आदिवासी वस्तूंना आणि हस्तकलांना मोठी संधी आहे. या संधीचा पूर्ण लाभ घेण्यासाठी सरकार येत्या काही वर्षांत आवश्यक उपाययोजना करत आहे.

# सोशल मीडियाच्या माध्यमातून हरवलेला मुलगा सुखरूप ताब्यात

- **नातेवाईकांचे पोलिस व ‘महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप’चे आभार**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिनांक 9 नोव्हेंबर 2025 रोजी घरातून रागावून निघून गेलेला दिगंबर बदरगे हा मुलगा नातेवाईकांच्या प्रयत्नांनंतर, पोलिसांच्या मदतीने आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे सोशल मीडियाच्या माध्यमातून सुखरूप सापडला आहे.

नातेवाईकांनी घराजवळील तसेच सिंहगड परिसरात शोधमोहीम राबवली, मात्र तो मिळून येत नव्हता. त्यानंतर त्यांनी हवेली पोलीस स्टेशनमध्ये हरवल्याची तक्रार नोंदवली. परिसरातील काही नागरिकांनी महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे अध्यक्ष शिवाभाऊ पासलकर यांच्याशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला.

यानुसार हरवलेल्या मुलाचे चुलते शिवाजी भदीर्गे हे 12 नोव्हेंबर रोजी सिंहगड रोडवरील शिवाभाऊ पासलकर यांच्या कार्यालयात गेले आणि संपूर्ण माहिती दिली.

पासलकर यांनी तत्काळ शोध पत्रिका तयार करून ती पूर्ण महाराष्ट्रभर तसेच पुणे शहरातील सर्वत्र व्हायरल केली.

नातेवाईक, मित्रपरिवार व गावातील अनेकांनीही ही शोध पत्रिका आपल्या सोशल मीडियावर स्टेटसला ठेवून प्रसार वाढवला.

याच दरम्यान, दिगंबरचा एक नातेवाईक राहुल रणखांबे हे मार्केट यार्ड येथे कामाला असताना त्यांनी स्टेटसमधील फोटो पाहिला आणि त्याच परिसरात फिरत असलेला दिगंबर त्यांना दिसला. त्यांनी तत्काळ त्याला थांबवून नातेवाईकांना फोन करून मुलगा सापडल्याची माहिती दिली.

यानंतर नातेवाईक, हवेली पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी संतोष तोडकर, महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शिवाभाऊ पासलकर व कुटुंबीय मार्केट यार्ड येथे दाखल झाले. त्यांनी दिगंबरला सुरक्षित ताब्यात घेऊन नातेवाईकांच्या स्वाधीन केले.

दिगंबर सुखरूप सापडल्याने नातेवाईकांनी हवेली पोलीस स्टेशन, महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप आणि मदत करणाऱ्या सर्व व्यक्तींप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# युवा सरपंच ते युवा नगरसेवक - जिद्दीचा प्रवास सुरू!

## खडकवासल्याचे मा. सरपंच सौरभनाना मते महानगरपालिकेसाठी सज्ज

**लोकांचा विश्वास, तरुणाईचा पाठिंबा आणि विकासाची न थांबणारी जिद्द घेऊन सौरभ नाना मते आता महानगरपालिकेच्या मैदानात उतरायला तयार आहेत. जगातील सर्व नागरिक व मतदार बंधू भगिनींनी आपल्या पाठीशी राहून आशीर्वाद द्यावा अशी विनंती माजी सरपंच सौरभ नाना मते यांनी यावेळी जनतेला केली आहे.**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी – खडकवासला – शिवणे परिसरातील नागरिकांच्या मनात गेल्या काही वर्षांत वेगाने उदयाला आलेले नाव म्हणजे युवा सरपंच सौरभ नाना जयसिंग मते. तळागाळातील विकासकामे, लोकसहभाग, आणि संकटाच्या काळातील दिलासा यामुळे आज ते प्रभाग क्रमांक 33 मधून युवा नगरसेवक म्हणून उभे राहण्याची जिद्द बाळगून पुढे येत आहेत. दैनिक आरंभपर्वच्या “मिशन महानगरपालिका” सदरामध्ये बोलताना त्यांनी आपल्या प्रवासाचा सविस्तर आढावा दिला.

कोविड काळात गावात भीतीचे वातावरण असताना सौरभ नानांनी घराघरांत जाऊन नागरिकांची आरोग्य तपासणी केली, गरजूंना अन्नधान्य दिले आणि सतत संपर्कात राहून लोकांना मानसिक धीर दिला. “नेतृत्व म्हणजे संकटातही लोकांसमोर उभे राहणे” हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.

सरपंच पदाची धुरा स्वीकारल्यानंतर त्यांनी खडकवासला गावाचा चेहरा बदलणारी अनेक महत्त्वाची कामे केली. ड्रेनेज लाईनसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा, गावातील सर्व अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण, कोल्हेवाडी येथील डिजिटल स्मार्ट क्लास व ई-लर्निंग अंगणवाडी, तसेच गावातील नवीन गार्डन आणि मुलांसाठी खेळाचे मैदान-या सर्व उपक्रमांनी गावाचा विकासाचा मार्ग अधिक सुकर केला. महिलांसाठी विविध आरोग्य शिबिरे आयोजित करून आणि आरोग्य शिक्षण सेवकांचा सन्मान करून त्यांनी महिला आरोग्याकडे विशेष लक्ष दिले.

समाजातील वंचित, दलित आणि दिव्यांग कुटुंबांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना तात्काळ मदत उपलब्ध करून देणे हे त्यांच्या कार्यातील विशेष वैशिष्ट्य ठरले.

“समाजातील शेवटचा घटकही सुखी असला पाहिजे, तेव्हाच खरा विकास” या त्यांच्या भूमिकेचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

स्त्रीसमृद्धीसाठी त्यांनी एक महत्त्वाचा निर्णय राबवला-सरपंच झाल्यानंतर गावात जन्मलेल्या प्रत्येक मुलीसाठी ग्रामपंचायतीमार्फत 10,000 रुपयांची ठेव. या उपक्रमामुळे गावात मुलींच्या जन्माबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले. खडकवासला आणि कोल्हेवाडी–कीरकटवाडी रस्त्यांची अवस्था सुधारण्यासाठीही सौरभ नानांनी सातत्याने पाठपुरावा केला. प्रलंबित असलेल्या या कामांना गती देऊन नागरिकांना मोठा दिलासा दिला. वाहतुकीची समस्या कमी होऊन दैनंदिन प्रवास सोयीस्कर झाला.

संवादादरम्यान बोलताना सौरभ मते म्हणाले- “मी परिपूर्ण नाही, पण शिकण्याची तयारी आणि काम करताना शिस्त व वेळेचे पालन हे माझे बळ आहे. प्रभागातील शेवटच्या नागरिकालाही मदत मिळाली पाहिजे, हा माझा विश्वास आहे.”

2017 साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जनतेतून त्यांची सरपंच पदी निवड झाली होती.

याबरोबरच तेराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक खडकवासला विधानसभा अध्यक्ष ही कार्यरत आहेत..

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)मध्ये त्यांची वाढती सक्रियता, वरिष्ठ नेत्यांशी असलेले चांगले संबंध, आणि पूर्ण केलेल्या विकासकामांचा मजबूत पाय पाहता प्रभाग क्रमांक 33 (धायरी पार्ट – शिवणे – खडकवासला) मधून ते प्रबळ दावेदार मानले जात आहेत. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही स्तरांचा समतोल साधून प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

समाविष्ट गाव असल्याने अनेक भौतिक सुविधाची वाणवा या भागाला आहे. चांगले दर्जेदार रस्ते, शुद्ध पाणी. वाहतूक याबरोबरच शहराप्रमाणे या भागाचे नंदनवन करण्याचा प्रयत्न त्यांनी बोलून दाखवला आहे. शहराप्रमाणे आम्हालाही सुविधा मिळायला पाहिजे त्यासाठी निश्चितपणे या भागाची जाण असलेला नेता नगरसेवक व्हायला पाहिजे या जनभावनेतून ते पुढे आले आहेत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.